# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.१५ वाजता)

(क) : **(मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५, बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ व गुरूवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ. मनिषा कायंदे, श्री.अमोल मिटकरी, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री संजय खोडके, सदाशिव खोत, कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, अमित गोरखे, किशोर दराडे, पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, किरण सरनाईक, श्रीकांत भारतीय, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर, धर्मगुरू राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात परकीय थेट गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असणे, शासनाने स्टार्टअप युको सिस्टीम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंडस्' तयार केला असून त्यायोगे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जाणार असणे, सर्क्युलर इकॉनॉमीवर भर देत महाराष्ट्र राज्य देशाची स्टार्टअप राजधानी बनली असणे, दावोस येथे ६३ कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारातून १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असणे, राज्यातील सहकारी संस्थांच्या विकासासाठी व ग्रामीण पतपुरवठा क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सहकार विभागाकडून अनेक उपाययोजना करण्यात आल्या असणे, 'सहकारातून समृध्दी' हा विकासात्मक दृष्टीकोन वास्तवात उतरविण्यासाठी केंद्र शासनाने 'सहकार मंत्रालयाची' स्थापना करण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले असणे, कृषी पतपुरवठा, सहकारी संस्थांचे संगणकीकरण या योजनेची अंमलबजावणी ५ वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली असणे, सहकारी संस्थांच्या व्यवसाय वृध्दीसाठी अटल अर्थसहाय्य योजनेस मुदतवाढ दिली असणे, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतरत्न डॉ. ए.पी. जे. कलाम अमृत आहार योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, आदर्श आश्रमशाळा, ठक्करबाप्पा आदिवासी विकास योजना, पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयं योजना इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येत असणे, आदिवासी उपाययोजनेच्या तरतुदीत मागील वर्षीच्या तुलनेत ४० टक्के एवढी भरीव वाढ करण्यात आली असणे, कोकणातील पर्यटनवृध्दी व्हावी व

पर्यटकांचा प्रवास सुलभ व सुखकर व्हावा यासाठी कोकणातील १७ रेल्वे स्थानकांना राष्ट्रीय / राज्य मार्गांशी जोडण्याचे काम हाती घेण्यात आले असणे, आंगणेवाडी हे राज्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असल्याने येथील मंदिराला जोडणाऱ्या ३३ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली असणे, सिंधुदुर्ग जिल्हयातील सागरी संग्रहालय, कृत्रिम प्रवाळ आणि पाणबुडी पर्यटन ही ७५ कोटी रुपये किंमतीची कामे प्रगतीपथावर असणे, पर्यटन क्षेत्रात खाजगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्याकरिता पर्यटन धोरण-२०२४ जाहिर करण्यात आले असणे, लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकासाकरिता लोणार सरोवर विकास समिती स्थापन करण्यात आली असणे, समुद्रातही पिंजरा पध्दतीने मत्स्य पालनास प्रोत्साहन देण्याचे धोरण राज्य शासनाने ठरविले असणे, राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांसाठी राज्यस्तरीय नुकसान भरपाई धोरण आखले असणे, मच्छिमार बांधवांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी पालघर जिल्हयातील साठपाटी येथे सर्व सुविधांयुक्त आदर्श मच्छि बाजारपेठ उभारण्याचे प्रस्तावित असणे, सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील मासेमारी करणाऱ्या नौकांवर वापरण्यात येणाऱ्या नायलॉन व मोनोफिलामेंट जाळी खरेदीवर ५० टक्के पर्यंत व रापण संघाच्या प्रत्येक सभासदाला रापणीच्या तयार जाळ्यांच्या किंमतीच्या ५० टक्के अनुदान देण्यात येणार असणे, विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी व राज्याला सृजणातून समृध्दीकडे नेण्यासाठी केलेल्या व करावयाच्या उपाययोजना."

## (सकाळी ११.१५ ते ११.४५ वाजता)

**(ख) : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये**

**(गुरूवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) - [अनुक्रमांक (१) व (२)] —**

(१) **सर्वश्री अंबादास दानवे, सुनिल शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"छत्रपती संभाजीनगर येथील वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वॉटरग्रेस या खाजगी कंपनीस "कन्सेन्ट टू एस्टॅब्लिशमेंट" ने परवानगी दिलेली असणे, सदर परवानगी देताना नियमानुसार आवश्यक असलेले महानगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), तसेच संबंधित यंत्रणांचे ना हरकत प्रमाणपत्र न घेताच सदर मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे, वॉटरग्रेस या कंपनीला महानगरपालिकेमार्फत गत २० वर्षांसाठी वैद्यकीय कचरा प्रक्रिया प्रकल्पाचा करार देण्यात आलेला असणे, पुन्हा कोणतीही खुली निविदा प्रक्रिया न

राबविता त्या कंपनीस मुदतवाढ देण्यात आलेली असणे, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा संनियंत्रण समितीच्या निर्देशानुसार बायोटेक वेस्ट लिमिटेड या नव्या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असणे, सदर कंपनी पर्यावरणीय दृष्ट्या अधिक सुरक्षित व स्वयंचलीत तंत्रज्ञान वापरणारी असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले असणे, तरीदेखील प्रदूषण नियंत्रण मंडळाने बायोटेकच्या प्रस्तावाला नकार देत वॉटरग्रेसच्या बाजूने निर्णय दिलेला असणे, सदरची बाब शासन यंत्रणेमध्ये नियमबाह्य कार्यपद्धती, संभाव्य हितसंबंध व पारदर्शकतेच्या अभावाकडे निर्देश करित असून, पर्यावरणीय, सार्वजनिक आरोग्य व प्रशासकीय पारदर्शकतेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर स्वरूपाची असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **सर्वश्री किरण सरनाईक, विक्रम काळे, जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात सन १९९० च्या दशकात आर्थिक परिस्थितीमुळे खाजगी शाळांना पूर्ण अनुदानाऐवजी टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याची योजना शासनाने स्वीकारली असणे, अनुदान टप्पा लागू झाल्यानंतर प्रचलित पध्दतीने पुढील पाच वर्षांच्या कालावधीत १००% अनुदान मिळणे निश्चित होणे, परंतु सन २०१६ नंतर शासनाने या अनुदान वितरणाची प्रचलित पध्दत व्यपगत करुन अनुदान वाटपात मनमानी पध्दतीने अनुदान टप्पा जाहीर करणे, त्यामुळे राज्यातील हजारो प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी १५ ते २० वर्षांपासून विनावेतन किंवा अत्यल्प वेतनावर सेवा देत असणे, यांच्यापैकी अनेकांचे शाळा मुल्यांकन पूर्ण झाले असूनही, अद्याप अनुदान वितरित झालेले नसणे, शिक्षक संघटनांनी दीर्घकाळ आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधणे, परिणामी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार निवडणुकीपूर्वी शासनाने टप्पा अनुदान जाहीर केले असणे, मात्र त्यानंतर ९ महिने उलटून गेले असतानाही कोणतीही अंमलबजावणी झालेली नसणे या विलंबामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य उपचार व दैनंदिन गरजा धोक्यात आल्या असणे, काही शिक्षकांनी उपासमार व मानसिक तणावामुळे आत्महत्या केली असल्याचेही नोंदविले गेले असणे, त्यामुळे शिक्षण व्यवस्थेतील गुणवत्ता व सातत्यावर प्रतिकूल परिणाम होत असणे, या पार्श्वभूमीवर, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करणे आणि त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

# (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे —**

(क) **शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.विक्रम काळे व इतर वि.प.स. यांचा "शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाची शैक्षणिक फीची प्रतिपुर्ती मिळणेबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३२१२.**

(ख) **तारांकित प्रश्न**

(ग) **तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** : "विदर्भातील सिंचन प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत" या विषयावरील श्री. अभिजित वंजारी व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २६१९ ला दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(घ) **अतारांकित प्रश्नोत्तराची दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : "**पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल येथील सेक्टर १ ते ११ मधील गृहनिर्माण सोसायट्यांच्या पुनर्विकासाबाबत.**" या विषयावरील श्री.विक्रांत पाटील, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३११ वरील चर्चेच्यावेळी दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन अहवाल (२) ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा

स्थानिक संस्थावरील वार्षिक तांत्रिक निरीक्षण अहवाल (३) सन २०२३-२०२४ या वर्षाचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल (४) मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **दिव्यांग कल्याण मंत्री** : "महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** : "महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ चे वार्षिक एकत्रित वित्तीय व महसुली लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती / राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल."**

**चार : महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पहिला अहवाल सादर करणे.**

**पाच : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(गुरूवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना) -[अनुक्रमांक (१)]**

(१) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २४ वर मदत व पुनर्वसन मंत्री निवेदन करतील :-**

मोर्बे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, बारवी धरणग्रस्तांप्रमाणे कोणतेही निकष न लावता कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेबाबत होत असलेली मागणी.

(२) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३० वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

नागपूर शहरातील नदी-नाल्यांच्या काठावरील वस्त्यांना पुराचा धोका निर्माण झाल्याबाबत.

(३) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २८ वर गृहनिर्माण मंत्री निवेदन करतील :-**
मुंबईतील ५६ म्हाडा वसाहतींना म्हाडाकडून सन २०२१ पासूनचे वाढीव सर्विस चार्जेस लावून, तसेच थकबाकीवर २१% व्याज आकारून थकबाकीची अवाजवी देयके पाठविण्यात आली असल्याबाबत.

(४) **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २७ वर महसूल मंत्री निवेदन करतील :-**
विरार-अलिबाग कॉरिडॉर तयार करताना डोंबिवली येथील निळजे ते हेटवणे येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करुन अनेक वर्ष उलटूनही अद्याप जमिनीचा मोबदला मिळत नसल्याबाबत.

(५) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २९ वर पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री निवेदन करतील :-**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात जिल्हास्तरीय जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्प स्थापन करण्याच्या संदर्भात निविदा प्रक्रिया जिल्हास्तरीय जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन संनियंत्रण समितीच्या मान्यतेविना राबविण्यात आल्याबाबत.

**सहा : (क) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-
"चांगल्या पगाराची सरकारी नोकरी मिळवण्यासाठी प्रत्येक बेरोजगार तरुण प्रयत्न करणे, प्रसिद्ध व्यक्ती, राजकीय नेते किंवा एखादे ॲप यावर पटकन विश्वास ठेवला जात असणे, बेरोजगार त्यांच्या आश्वासनांना बळी पडणे, मुंबईमध्ये चालू वर्षाच्या पहिल्या पाच महिन्यांत नोकरीच्या नावाने फसवणुकीचे सुमारे १५० गुन्हे दाखल करण्यात आले असणे, मुंबईतील लोअर परळ येथील एक तरुणास चांगल्या पगाराच्या नोकरीची ऑफर देईल असे एका ॲपच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवून एका व्यक्तीने ज्या तरुणाची सुमारे आठ लाख रुपयांची फसवणूक करणे, तसेच अंधेरीला राहणाऱ्या ३० वर्षीय शिक्षिकेने वांद्रे येथील एका वैद्यकीय

महाविद्यालयात सहायक प्राध्यापिका या पदासाठी अर्ज केला असता तिला एका अनोळखी व्यक्तीने फोन करून वैद्यकीय महाविद्यालयात असिस्टंट प्रोफेसर म्हणून निवड झाल्याचे सांगणे व यातून ७६ हजार रुपयांची फसवणूक करणे, अन्य एका घटनेत, मालाडच्या दिंडोशी येथील एका तरुणाने नोकरी उपलब्ध करून देणाऱ्या ॲपवर नोंदणी केली व काही दिवसांनी त्याला बोटीवर नोकरी उपलब्ध असल्याचे कळविण्यात येणे, त्यांच्या सांगण्यानुसार सुमारे दोन लाख रुपये भरल्याने त्याची फसवणूक होणे, राज्यातही अशा अनेक फसवणुकीच्या घटना घडत असून बेरोजगार तरुणांची मोठी फसवणूक केली जात असणे, यावर शासनाने तात्काळ चौकशी करून बोगस ॲप वर बंदी घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील उपसा जलसिंचन संस्थाना मार्च, २०२५ अखेर पर्यंत सवलतीच्या दराने वीजदर प्रति युनिट १.१६ रुपये, इंधन अधिभार रुपये ०.२० ते ०.४०, डिमांड चार्जेस ७२ रुपये प्रति केव्हीए या दराने वीज पुरवठा करण्यात येत असणे, परंतु एप्रिल, २०२५ पासून उपसा जलसिंचन संस्थांना पूर्व सूचना न देता अचानक सवलतीच्या दराने न देता वीजदर प्रति युनिट रुपये ५.७८, व्हिलिंग चार्जेस प्रति युनिट रुपये ०.६०, डिमांड चार्जेस रुपये ९७ प्रति केव्हीए अशी प्रचंड दर वाढ करुन बिले देण्यात आली असल्यामुळे संस्थांमध्ये व शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, वाढीव दराने वीजबिल दिल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना व संस्थांना बसलेला धक्का, वाढीव दराने वीजबिले देण्यात आली असल्यामुळे पाणीपट्टीच्या दरात संस्थांना वाढ करावी लागणे अपरिहार्य असणे, त्यामुळे शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या कर्जावरील व्याजाच्या थकबाकीची संपूर्ण रक्कम संबंधित जिल्हा बँक, राष्ट्रीयीकृत बँकांनी माफ केल्यानंतर थकीत मुद्दलाची रक्कम राज्य शासनाकडून भरण्याचा निर्णय शासनाने एक वर्षापूर्वी घेऊन सुद्धा अद्याप त्याची अंमलबजावणी करण्यात न येणे, त्यामुळे पूर्वी प्रमाणेच सवलतीच्या दराने वीजबील आकारण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.इद्रिस नायकवडी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र शासनाच्या “ॲडव्होकेट्स क्लार्क ॲक्ट, १९६१" भाग ३ मधील तरतुदीनुसार ॲडव्होकेट्स क्लार्क त्यांना जिल्हा न्यायालयामार्फत

वकिलाचे क्लार्क म्हणून काम करणेकरीता रीतसर परवाना दिले जातात, न्याय व्यवस्थेमध्ये काम करत असताना, वकिलांचे मदतनीस म्हणून ते वकिलाला त्यांच्या व्यवसायामध्ये दावा दाखल करणे पासून दाव्याचे कामकाज पूर्ण करण्याबाबत महत्वाची भूमिका बजावत असणे, दिनांक १७ फेब्रुवारी, १९४० रोजी ॲडव्होकेट्स क्लार्क कायदा अस्तित्वात आला असून या कायद्यानुसार वकिलांना व न्यायाधीशांना सहकार्य व कायदेशीर कामात मदत करत असणे, त्यांना कोर्टात येणाऱ्या पक्षकारांकडून अल्पसा मोबदला मिळणे, त्यावरच उदरनिर्वाह होत असणे, परंतु महाराष्ट्र शासनाने अद्याप अश्या पद्धतीचा कायदा अस्तित्वात न आणल्यामुळे ॲडव्होकेट क्लार्क्स यांना काहीही फायदा व काहीही मोबदला न मिळणे, इतर काही घटकांना शासन मदत करीत असताना महाराष्ट्र शासनाकडून अशा या घटकाला दुर्लक्षित केले जाणे, अनेक राज्यामध्ये सरकारने अश्या पद्धतीचे ॲडव्होकेट्स क्लार्क यांच्याबाबत कायदा करून "ॲडव्होकेट्स क्लार्क्स फंड" नावाची स्थापना केलेली असणे, त्याद्वारे ॲडव्होकेट्स क्लार्क यांना त्यांच्या निवृत्तीच्या आयुष्यात किंवा त्यांच्या निवृत्त झाल्यानंतर त्याबाबतचा फायदा मिळत असणे, कायमस्वरुपी आर्थिक सहाय्य, सेवासुविधा व इतर फायदे देण्याबाबत शासनाकडे वारंवार होत असलेली मागणी, त्यानुसार राज्यात "ॲडव्होकेट्स क्लार्क वेलफेअर फंड" ची स्थापना करण्याच्या दृष्टीने तसेच योग्य आर्थिक मोबदला व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(४) **श्री.दादाराव केचे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"वर्धा जिल्ह्यातील आर्वी नगरपरिषदमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगर नगरोत्थान अभियानांतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर होऊन प्रशासकीय मान्यता दिनांक २२ मार्च २०१८ ला प्राप्त असून २२.४३ कोटीचा निधी मंजूर असणे, मे.संतोष कन्स्ट्रक्शन अँड इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड नांदेड या कंपनीस दिनांक ०१ जुलै, २०१९ ला कार्यारंभ आदेश देऊन १८ महिन्यात काम पूर्ण करण्याचा कालावधी दिलेला असताना सुद्धा अद्यापही कामे पूर्ण झालेली नसणे, तसेच आर्वी शहरासाठी जलशुद्धीकरण केंद्राकरिता ११ कोटी ८ हजार मंजूर असून त्याचा कार्यारंभ आदेश दिनांक ०१ जुलै, २०१९ व काम पूर्ण करण्याचा कालावधी १८ महिन्यांचा असताना ही या जलशुद्धीकरण केंद्राचे काम मे.गणेश अँड गणेश असोसिएट, नागपूर या कंपनीने पूर्ण केलेले नसणे, त्यामुळे आर्वी शहरातील नागरिकांना शुद्ध पाण्याचा पाणीपुरवठा होत नसणे, तसेच आर्वी शहराकरिता मल:निस्सारण योजनेकरिता ४७.४३ कोटीचा निधी मंजूर असून सदरचे काम मे.संतोष

कन्स्ट्रक्शन अँड इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, नांदेड या कंपनीस मिळालेले असून काम पूर्ण करण्याचा कालावधी १८ महिन्यांचा असतानाही अद्याप कामे अपूर्ण असणे, शहरातील तिन्ही मोठी कामे कंत्राटदारांच्या व अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे अपूर्ण असल्याने नागरिकांना सोयी-सुविधांपासून वंचित राहावे लागत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"साक्री नगरपंचायतीसाठी मालनगाव धरणातून गुरुत्वाकर्षणद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या प्रकल्पास सन २०२१ मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली असणे, मात्र या मंजूर प्रकल्पाऐवजी नगरपंचायतीने नवीन ठराव करून अक्कलपाडा धरणातून पाणीपुरवठा करण्याची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्याचा प्रस्ताव पुढे आणल्याची माहिती समोर येणे, ही बाब साक्री नगरपंचायतीच्या हिताविरुद्ध ठरणे, कारण अक्कलपाडा धरण हे साक्री गावाच्या सुमारे २०० मीटर खाली असून तेथून पंपिंगद्वारे पाणी उचलावे लागणार असणे, या बदलामुळे दरवर्षी सुमारे १६०.०० लक्ष रुपयांचा अतिरिक्त खर्च देखभाल व दुरुस्तीसाठी अपेक्षित असून, तो खर्च साक्री नगरपंचायतीवर (आणि अप्रत्यक्षपणे नागरिकांवर) लादला जाणे, सदर प्रकल्पाबाबत झालेल्या निर्णय बदलामुळे साक्री नगरपंचायतीवर अनावश्यक आर्थिक भार पडणे, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून आधीच मंजूर झालेला आणि आर्थिकदृष्ट्या अधिक शाश्वत असलेला मालनगाव धरण प्रकल्प तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (वित्त व नियोजन)** लक्ष वेधतील :-

"सोलापूर जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीचा लाभ घेऊन जल, कृषी, धार्मिक व विनयार्ड पर्यटनाच्या अनुषंगाने विविध सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी प्रशासनाकडून सुमारे २५० कोटींचा उजनी धरण एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर करण्यात आला असणे, या अंतर्गत उजनी धरणात जलपर्यटन, ९४ धार्मिक स्थळे असल्याने धार्मिक पर्यटन, कृषी क्षेत्रात अग्रेसर असल्याने कृषी पर्यटन तसेच विनयार्ड पर्यटन विकसित

होण्यासाठी पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्याचे प्रस्तावित असणे,उजनी धरणावर दरवर्षी हजारो मैलावरून वरून विदेशी पक्षी येत असल्याने हे ठिकाण पक्षी निरीक्षणासाठी प्रसिद्ध असणे,तसेच येथे अक्वॉटिक टुरिझम,वॉटर स्पोर्ट टुरिझम मोठ्या प्रमाणावर विकसित होऊ शकत असणे,उजनी धरणाच्या विस्तीर्ण पात्रामुळे येथे पर्यटकांना गोड्या पाण्याचा समुद्र अनुभवायला मिळणार असून या ठिकाणी देशातील सर्वात मोठा जलतरण तलाव प्रस्तावित केला असणे, दरम्यान या कामांसाठी सन २०२७ पर्यंत मुदत देण्यात आलेली असणे, मात्र उजनी धरणाच्या जलाशय व काही परिसरातील काही जमिनीवर कृष्णा खोरे विकास महामंडळाने करारासाठी हक्क सांगितल्याने उजनी जलपर्यटन केंद्रासाठी बोट खरेदीची निविदा रद्द झाली असणे,त्यामुळे उजनी पर्यटन विकासाला लागलेला ब्रेक,यामुळे स्थानिक जनता व पर्यटकांमधून व्यक्त होत असलेली नाराजी यामुळे एकाच ठिकाणी जल,कृषी व विनयार्ड,धार्मिक पर्यटनाचे अनोखे मिश्रण असलेल्या उजनी धरण एकात्मिक पर्यटन आराखड्याला गती देण्यासाठी तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (राज्य उत्पादन शुल्क)** लक्ष वेधतील :-

"राज्यात घरपोच मद्यविक्रीबाबत स्पष्ट आणि सर्वसमावेशक धोरण नसूनही लिव्हींग लिक्विड सारखे मद्यविक्रेते आपले ॲप विकसीत करुन घरपोच मद्यविक्री करीत असणे, या अवैध विक्रीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कोणतीच कारवाई न करणे, मुंबईमध्ये मे.किंग वाईन्स, मे.वाईन वॉल्ट बिअर ॲण्ड डायनोसेसे ब्रुवरिज लि. मे.जुहू बिअर ॲन्ड वाईन शॉप, मे. आयरीश वाईन्स, मे.लिव्हींग लिक्वीड अर्बन वेंचन प्रा.लि., ठाणेतील मे. लिव्हींग इंटरटेनमेंट ॲन्ड लाईफ स्टाईल प्रा.लि. व पुण्यातील मे.चार्ली वाईन्स, मे.गोल्ड वाईन्स, मे.सी.आर.अग्रवाल ॲन्ड सन्स या मद्य विक्रेत्यांकडून ॲप द्वारे घरपोच मद्यविक्री करण्यात येत असणे, याबाबत सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रार केल्यानंतर दंडात्मक कारवाई करण्यापलीकडे कोणतीही कारवाई संबंधितांनवर न करणे, याबाबत शासनाने ॲप द्वारे घरपोच मद्यविक्री करणाऱ्या मद्य विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करुन त्यांना शासनाकडून मद्यविक्रीसाठी देण्यात आलेले परवाने रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.शिवाजीराव गर्जे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील इनाम वर्ग-६ ब व महार वतनाची जमिन दिनांक १ जून, १९६२ रोजी नष्ट करण्यात आलेली असणे, तसेच या समाजातील इनामी जमिन खालसा करून कर आकारणी करण्यात आलेले असणे, कब्जा हक्काची रक्कम (जमिनीची आकारणी ३ पट) शासन जमा करून जमीन रिग्रंट (Regrant) करणे आवश्यक असणे, परंतु समाजातील अडाणीपण व अशिक्षितपणामुळे ३ पट रक्कम न भरल्यामुळे उताऱ्यावर इनाम वर्ग-६ ब व वर्ग-२ चा शेरा असणे, समाजातील सुशिक्षित तरुणांना पंतप्रधान योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बँकांमार्फत कर्ज प्रकरण करायचे असल्यास त्यांना अकृषक जमिनी असल्याचा दाखला दिल्याशिवाय कर्ज मंजूर न होणे, तसेच मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ मध्ये तरतुदी वगळण्यात आलेली नसणे, त्यामुळे महार वतन जमिनीचे शेती अथवा बिनशेती प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय हस्तांतरणे झालेली असणे, कायद्यातील तरतूदीमध्ये सुधारणा करणे आवश्यक असणे, येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कायद्यामध्ये बदल करुन कब्जा हक्काची रक्कम भरण्यास मुदतवाढ देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"विदर्भातील अमरावती विभागात विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, या विभागात अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा इत्यादी जिल्ह्यांचा समावेश असणे, अमरावती येथे या पाचही जिल्ह्यांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विद्यापीठ असून या विद्यापीठात वाशिम, अकोला व बुलढाणा या भागातील लाखों विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता अमरावती येथे दिडशे किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरुन प्रवास करुन विद्यार्जनासाठी जावे लागते, परिणामी त्यांचे श्रम, वेळ व पैसा खर्ची जात असतो, या भागातील लाखों विद्यार्थ्यांची अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांकरीता बुलढाणा येथे "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी असणे, या भागात शैक्षणिक बाबींचे जलदगतीने संनियंत्रण व नियोजन होण्याच्या दृष्टीने बुलढाणा येथे उपरोक्त तीन जिल्ह्यांकरिता "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **सर्वश्री सुधाकर अडबाले, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर जिल्ह्यातील खासगी अनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या थकीत ९ कोटींच्या महागाई भत्त्याच्या वितरणात गैरव्यवहार झाला असणे, प्रशासकीय मंजुरीशिवाय सुमारे ९ कोटी रूपयांची डी.ए. एरिअर्सची देयके थेट शालार्थ प्रणालीतील एरिअर्स टॅबद्वारे वितरीत केले असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पोलिस उपायुक्त नागपूर यांना निवेदनाद्वारे केली असणे, नऊ कोटींच्या थकीत महागाई भत्ता वितरणात गैरव्यवहार प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ चे शिक्षक मंजुरीचे धोरण अंमलात आणताना मुंबईतील मराठी व अन्य प्रादेशिक भाषांच्या माध्यमाच्या शाळांतील हजारो शिक्षक अतिरिक्त होणे, सेवानिवृत्ती व अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांवर त्यापैकी बहुतांशी शिक्षकांचे समायोजन झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या शिक्षकांना शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ नुसार मुंबई महानगरपालिकेतील ५०० हून अधिक रिक्त जागांवर सामावून घेणे शक्य असताना सदर शासन धोरणाकडे दुर्लक्ष करून शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांनी जवळ जवळ १७० शिक्षकांना मुंबईपासून लांब पालघर,रायगड व ठाणे जिल्ह्यातील आदिवासी, दुर्गम भागातील शाळांमध्ये या अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचे नियमबाह्य आदेश काढले जाणे, जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रिक्त जागा उपलब्ध असल्यास जिल्ह्याबाहेर समायोजन न करण्याचे शासनादेश असणे, त्यांचे उघडपणे आणि हेतुतः उल्लंघन केले जाणे, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम २६ प्रमाणे अतिरिक्त शिक्षकांना जिल्ह्यांतर्गत समावेशित करेपर्यंत मूळ शाळेतील वेतन सातत्य कायम ठेवणे बंधनकारक असणे, मुंबई जिल्ह्यातील महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जागा रिक्त असताना शिक्षकांची गैरसोय करण्याच्या गैरहेतूने प्रेरित होऊन शिक्षकांना नियमबाह्य पद्धतीने मुंबई बाहेरील जिल्ह्यातील दुर्गम भागातील शाळांमध्ये समायोजित केले जाणे व त्यांचे तीन महिन्यांपासून बेकायदेशीरपणे वेतन थांबविणे, शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या या नियमबाह्य कार्यवाहीबाबत शासन करीत असलेली कार्यवाही."

(१२) **ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मृद व जलसंधारण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापूर जिल्हयात जलसंधारण विभागाच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेमध्ये करोडो रुपयांचा झालेला गैरव्यवहार, महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचे व्यवस्थापकीय संचालक यांनी ठराविक व मर्जीतील कंत्राटदारांना हाताशी धरुन अधिकारी व कंत्राटदार यांच्याशी संगनमत करुन एक थेंबही पाणी न अडवता जुन्या कामाची दुरुस्ती करुन शासनाच्या तिजोरीची केलेली लूट, कंत्राटदाराकडे काम करण्यासाठी आवश्यक तेवढी मशिनरी, इंजिनियर, तसेच शासकीय नियमाप्रमाणे आर्थिक पात्रता नसतांना नियमांचा भंग करुन दिलेले काम, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी तीन पदाचा कार्यभार बेकायदेशीरपणे स्वत:कडे ठेऊन चौपट वाढीव रक्कमेच्या दायित्वाला बेकायदेशीरपणे मंजूरी देऊन शासनाचे कोट्यवधी रुपयांचे केलेले नुकसान अनेक कंत्राटदारांची कामे सुरू झालेली नाहीत असे असतांना त्या कामावर करोडो रुपयांची वाढीवदायित्व व काम नसताना बिल देयक अदा करुन केलेला गैरव्यवहार, वरसिध्दी कंट्रक्शन, टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर यांची कागदपत्र खोटी असताना त्यांना ३०० कोटी रुपयांची कामे बेकायदेशीरपणे देऊन त्याची बीड कॅपॅसिटी ४४ कोटी रुपये असताना ३०० कोटीची कामे देणे, वरिष्ठ भूवैज्ञानिक जिल्हा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा अधिकारी, सोलापूर यांनी कोणतीही पाहणी न करता लाखो रुपये घेऊन खोटी प्रमाणपत्र देणे, चुकीच्या प्रमाणपत्रामुळे करोडो रुपयांचा गैरव्यवहार, कंत्राटदारांनी शासनाने दिलेल्या जीएसटीच्या रकमेमध्ये गैरव्यवहार करुन जीएसटीची रक्कम शासनास भरणा केलेली नसणे, शासनाच्या हजारो करोडो रुपयांचा निधी खर्च करुन खोटी प्रमाणपत्रे घेऊन जुनी कामे दाखवून देयके अदा करणे, आर्थिक पात्रता नसतांना कंत्राट घेणे आदी. प्रकरणी शासनाची फसवणूक करुन करोडो रुपयांचा गैरव्यवहार झालेला असणे, याबाबत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, सदर गैरव्यवहार प्रकरणी सखोल चौकशी करुन जबाबदार दोर्षीविरुध्द शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१३) **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बुलढाणा जिल्हयात काही व्यक्तींनी विमुक्त जाती (अ) प्रवर्गातील बोगस जात वैधता प्रमाणपत्र घेऊन खऱ्या लाभार्थ्यांच्या जागेवर नोकरी मिळविल्याने खरे लाभार्थी नोकरी मिळण्यापासून वंचित राहत असल्याचे आढळून येणे, बोगस प्रमाणपत्र घेऊन नोकरी मिळविणाऱ्या व्यक्तीविरुध्द

संबंधित विभागाकडे लोकप्रतिनिधी व नागरीक यांनी वारंवार तक्रार केल्यानंतर यासंदर्भात जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी चौकशी करुन त्यांचा चौकशी अहवाल राज्य शासनाकडे २ वर्षांपूर्वी पाठविण्यात येऊनही अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, या ५० जात प्रमाणपत्र चौकशीमध्ये ४८ प्रमाणपत्रे बोगस असल्याची बाब निदर्शनास येणे, परंतु राज्य शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येत नसल्याने जनमानसांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(ख) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे. (जोडपत्र पहावे.)**

**सात : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**आठ : मा.समिती प्रमुख, विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव –**

विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

**(१)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी उप मुख्य अभियंता (शहर), इमारत प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, वडाळा, मुंबई यांचेविरुध्द दिनांक २ मे, २०२३ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

**(२)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी सत्यलढा स्थानिक युट्यूब चॅनलचे संपादक श्री. सतिश देशमुख व पत्रकार श्री. गणेश सोनावणे, श्रीमती हर्षदा सोनावणे, श्री.अमोल नांदुरकर व श्री.अंकुश गावंडे (स्थानिक युवक) यांचेविरुध्द दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

**(३)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. प्रविण दरेकर यांनी श्रीमती सुषमा अंधारे, प्रवक्त्या शिवसेना (उबाठा) गट व स्टँडअप कॉमेडियन श्री.कुणाल कामरा यांचेविरुध्द दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

या तीन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानपरिषद नियम १७८ च्या पोट नियम (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**नऊ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ व शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) – [अनुक्रमांक (१)] –**

(१) **सर्वश्री अंबादास दानवे,** राजेश राठोड, सचिन अहिर, सुनिल शिंदे, डॉ. प्रज्ञा सातव, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"मराठवाड्याच्या विकासासाठी प्रकल्पांची घोषणा करुन शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत नसणे, दिनांक १६ सप्टेंबर, २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये रुपये ४६००० कोटीच्या निधींच्या कामांची घोषणा होणे, बैठकीमध्ये मराठवाड्यातील विकास कामांसाठी जाहिर करण्यात आलेला निधी शासनाकडे मागणी करुनही उपलब्ध होत नसल्याने मराठवाड्यातील अनेक विकासकामे व प्रकल्प निधीअभावी अपुर्ण अवस्थेत असणे, जलसंपदा विभागास २१ हजार कोटींच्या निधीची घोषणा होऊनही निधी न दिल्याने मराठवाड्यातील प्रकल्प अपुर्ण अवस्थेत असल्यामुळे १ हेक्टर सुध्दा सिंचनामध्ये वाढ न होणे, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेसाठी प्रत्यक्षात सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूदच नसणे, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेमध्ये असलेल्या प्रकल्पांचे काम अपुर्ण असल्याने मराठवाडा जिल्ह्यातील शेतीवर व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन मराठवाडयाच्या विकासावर त्याचा परिणाम होणे, छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मराठवाड्यासाठी महत्वाचे असलेला क्रीडा विद्यापीठ ४६.६० हेक्टरवर उभारण्यास मंजुरी देण्यात येणे, परंतु निधी उपलब्ध करुन न दिल्याने अपूर्ण अवस्थेत असणे, मराठवाड्याच्या विकासामध्ये शेतीचे महत्वाचे योगदान असून हळद पिकासाठी पोषक वातावरण मराठवाड्यात असल्याने मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राला मंजूरी देण्यात येणे, परंतु सदर प्रकल्प निधीअभावी पूर्ण मराठवाड्यात राबविण्यात आलेला नसणे, मराठवाड्यातील मंजुर करण्यात आलेली विकास कामे व प्रकल्पांना वेळेवर निधी उपलब्ध करुन न दिल्याने प्रकल्पांच्या किंमतीमध्ये सुध्दा वाढ होत असणे, परिणामी शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, मंजूर विकास कामांना व प्रकल्पांची अंमलबजावणी घेण्यात येणाऱ्या निर्णयानुसार करण्यात येत नसल्याने मराठवाड्याच्या विकासावर व पायाभूत सुविधांवर त्याचा गंभीर परिणाम होणे, त्यामुळे मराठवाड्यात बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ होत असून जनतेमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा)** — [अनुक्रमांक (२) व (३)] —

(२) **ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पोलीस प्रशासनाकडून हिंदू समाजातील तरुणांवर राजकीय दबावाखाली खोटे गुन्हे दाखल होत असणे, राजकीय हस्तक्षेपामुळे हिंदू समाजातील व्यक्तींवर झालेला अन्याय, अत्याचार, शारिरीक हल्ले व आरोपींनी त्यांच्या मालमत्तेचे केलेले नुकसान इत्यादी गुन्ह्यांबाबत पोलिसांकडून सहजासहजी तक्रार दाखल करुन घेतली जात नसणे, यामुळे हिंदू समाजातील व्यक्तींना प्रचंड त्रास होत असणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमीच्या संचलनात धार्मिक भावना दुखावतील अशा घोषणा देणे, परंतु पोलीसांनी हिंदू तरुणांवर लाठीचार्ज करणे, पतितपावन मंदिरात महाआरतीचे शांततेत आयोजन करणे, परंतु पोलीसांनी सदर महाआरतीत सहभागी होणाऱ्या ३ ते ४ हिंदू तरुणांवर गुन्हे दाखल करणे, भाटकरवाडा पेठकिल्ला येथे दुचाकी जाळून तेथे धार्मिक तेढ निर्माण होईल असे पत्रक टाकलेले असणे, परंतु या प्रकरणात तक्रारदार हाच आरोपी असल्याचे सिद्ध होऊनही, परिसरातील हिंदू तरुणांना पोलीसांकडून नाहक त्रास दिलेला असणे, संगमेश्वर/देवरुख येथील नागरीक पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रध्दांजली वाहत असताना, नाविद कापडी नामक व्यक्तीकडून याची खिल्ली उडविणे, त्याच्या या कृत्याबाबत नागरीकांनी त्याला जाब विचारला असता त्याने व त्याचा सराईत गुन्हेगार मित्र छोट्या गवाणकर याने नागरीकांना जीवे मारण्याची धमकी दिली असणे, शासकीय तंत्रविद्यालयात राष्ट्रगीत ऐवजी नमाज पढला जात असणे, याबाबत पोलीसांना कळवूनही त्यांनी कोणतीही कारवाई केलेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री धीरज लिंगाडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"बुलढाणा शहरातील जुने पोलीस अधिक्षक कार्यालय समोरील डी.एड. आणि बी.एड. महाविद्यालयाकरीता राखीव असलेल्या शैक्षणिक प्रयोजनाची जागा (नझुल शिट क्र.१० ए. भूखंड क्र.५/१) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित असणे, सदरहू जागा नगरपालिकेने वाणिज्य प्रयोजनाकरीता मागितली असणे, सद्य:स्थितीत सदर जागेवर शैक्षणिक आरक्षण असून ही जागा उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणारे महाविद्यालय व कौशल्य विभागाच्या अभ्यासक्रमासाठी उपयोगाची ठरणार असणे, तसेच जिल्ह्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागातील शिकाऊ विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी या जागेचा उपयोग होणार असणे, बुलढाणा शहराच्या प्रलंबित असलेल्या विकास आराखडयात अडचणी निर्माण होऊ नये याकरीता बुलढाणा जिल्ह्यातील उक्त जागा नगरपालिकेच्या वाणिज्य

प्रयोजनासाठी देण्यासाठी नाकारण्यात येणे, सदरील जागा नगरपालिकेला वाणिज्य प्रयोजनाकरीता देण्यासाठी नगरविकास विभाग प्रयत्न करीत असणे, यामुळे बुलढाणा शहराचा विकास आराखडा ६ महिने प्रकाशित झालेला नसणे, त्यामुळे ही जागा नगरपालिकेला देऊ नये अशी होत असलेली मागणी, परंतु शासन याकडे करत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने बुलढाणा शहराचा विकास आराखडा तात्काळ प्रकाशित करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री विक्रांत पाटील, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, अमित गोरखे, वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यातील पनवेल व नवी मुंबई या शहरांची उभारणी करून मुंबईकडे येणारा जनप्रवाह नवी मुंबई व पनवेलच्या दिशेने वळविणे तसेच रोजगाराकरिता स्थलांतर करणाऱ्या लोकांना त्या शहरात, पर्यायी नागरी व्यवस्थेबरोबरच, सौख्यपूर्ण जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा आणि स्थैर्य देण्यासाठी "महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ" ची स्थापना करण्यात आलेल्या प्राधिकरणाकडून अनेक चुकीचे प्रकार घडत असल्याची बाब उघडकीस येणे, सर्वसामान्यांना परवडतील अशा उत्तम गुणवत्ता असलेल्या घरांची बांधणी करून ती लॉटरीद्वारे विक्री करणाऱ्या सिडकोकडून देण्यात आलेली घरे ही निष्कृष्ट दर्जाची असणे, घरांचा ताबा देत असताना ग्राहकांना कबूल केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करताना सिडकोकडून होत असलेली टाळाटाळ, सिडकोच्या घरांच्या किंमती या खाजगी विकासकांपेक्षा वाढीव असणे, E.W.S. अंतर्गत प्रकल्प बांधकाम करून त्या घरांची L.I.G. अंतर्गत करण्यात आलेली विक्री, प्रधान मंत्री आवास योजनेच्या लाभापासून ग्राहकांना वंचित ठेवण्याचा सिडकोकडून सातत्याने होत असलेला प्रयत्न, सिडकोने विकसित केलेल्या वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय व पायाभूत सोयीसुविधांचा अभाव, त्यातच आंतरराष्ट्रीय पनवेल-नवी मुंबई विमानतळाच्या २० कि.मी. त्रिज्येतील परीक्षेत्राचे सुनियोजित ध्येय ठेवून "नैना सिडको-विशेष नियोजित प्राधिकरणाची" सन २०१३ मध्ये करण्यात आलेली स्थापना, या नियोजनामध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या त्रुटी, तसेच ड्रोन सर्व्हे ऐवजी जागेवर प्रत्यक्ष सर्व्हे करण्यात सिडकोच्या कामात कमी असलेली गती, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन कार्यवाही करण्याची नितांत गरज असताना त्याकडे जाणुन-बुजून करण्यात येत असलेले दुर्लक्ष, रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या घरांचे पुनर्वसन कसे होणार हे अस्पष्ट असून जागेसंदर्भात शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे देण्यात न आल्याने तसेच नैना क्षेत्रातील घरांचे बंद असलेले रजिस्ट्रेशन तात्काळ सुरू करण्याच्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने लाखो शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड, लोकप्रतिनिधी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी यांच्याकडून वेळोवेळी

करण्यात येत असलेल्या विविध तक्रारींचे निराकरण होत नसल्याने सिडकोच्या कार्यपद्धतीवरील उडत चाललेला जनतेचा विश्वास, सिडकोचा कारभार योग्य व सुनियोजित तसेच सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून चालावा, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **श्री.श्रीकांत भारतीय, डॉ. मनिषा कायंदे, श्री.अमित गोरखे, वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"सध्या राज्यात संतपीठ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एक विभाग म्हणून असणे, त्या ऐवजी संतपीठाला स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा मिळण्याची आवश्यकता असणे, तेथे घेण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाला सर्टिफिकेट कोर्स ऐवजी पदविका पदवी व पदव्युत्तर पदवी असा दर्जा देण्याची आवश्यकता असणे, त्यानुषंगाने निधी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची आवश्यकता असणे, संतपीठाच्या माध्यमातून युवकांमध्ये नैतिकता समता अध्यात्मिक आणि सामाजिक ऐक्याची मूल्य रुजविण्यासाठी विशेष कार्यक्रम आखण्याची आवश्यकता, संतपीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**दहा : शासकीय विधेयक –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**अकरा : सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, अरुण लाड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची पायमल्ली होत असून विविध ठिकाणी घरफोड्या, दरोडे, खून, सायबर गुन्हे, संघटित गुन्हेगारी तसेच महिला व अल्पवयीन मुलींवरील

अत्याचारांच्या घटनांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून बीड, पुणे व इतर जिल्ह्यांतून गंभीर प्रकार समोर येणे, पुण्यातील हगवणे कौटुंबिक प्रकरणात झालेला न्यायालयीन व प्रशासकीय विलंब, बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपीस अटक करण्यास पोलिसांना आलेले अपयश, परभणी येथे सोमनाथ सुर्यवंशी यांना झालेल्या मारहाण प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याबाबत सूचना देऊनही अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, मुंब्रा येथील रहिवाशी जमील शेख यांची राजकीय वादातून झालेली हत्या, याचप्रकारे राजकीय पक्षाचे पदाधिकारी राजरोसपणे खून करीत असल्याच्या घटना घडत असून त्यांना अटक करण्यापासून संरक्षण देण्याचा सुरु असलेला प्रयत्न, अंमली पदार्थाच्या तस्करीत वाढ झालेली असून विविध प्रकरणात पोलिसांचाच समावेश असल्याचे तपासात निष्पन्न झालेले असणे, राज्यात पोलीस यंत्रणेचा वापर करून विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर दबाव आणून पक्षांतर घडवून आणण्याचे सुरु असलेले प्रकार, काही मंत्र्यांकडून स्वतःचा हेतू साध्य करण्यासाठी होत असलेला पदाचा गैरवापर, त्यांच्या खात्यामध्ये झालेले घोटाळे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न झाल्यामुळे प्रशासकाचा सुरु असलेला मनमानी कारभार व त्यामुळे महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती या अंतर्गत येणाऱ्या शहरी भागात पायाभूत सुविधांचा उडालेला बोजवारा, लोकप्रतिनिधींचा वचक नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधीचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याची प्रकरणे उघडकीस येणे, निधी अभावी स्थानिक स्वराज्य संस्थांची विकास कामे प्रलंबित असणे, मुंबईतील मोक्याचे भूखंड खाजगी विकासकास देण्याचा सुरु असलेला प्रयत्न तसेच रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार, ठाणे येथील रतनशी प्रेमजी चॅरिटेबल ट्रस्टची जागा चुकीच्या पध्दतीने हस्तांतरण करुन शासनाची केलेली फसवणूक, कोकणातील रस्त्यांची झालेली दुरवस्था, महसूल, वने, नगरविकास, सामाजिक न्याय, गृह तसेच इतर विभागातील निविदा प्रक्रिया व अन्य कामात गैरव्यवहार उघडकीस येणे, राज्यात आपल्या जवळील व्यक्तीच्या फायद्यासाठी मद्यविक्री परवाने देण्याची कार्यवाही सुरु असणे, त्यामुळे तरुण पिढी व्यसनाच्या अधीन जाऊन अनेक संसार उद्ध्वस्त होणार असणे, महाराष्ट्रात मराठी भाषेची होत असलेली गळचेपी, मेंढपाळ समुदायाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**बारा : अशासकीय विधेयके :-**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ९ – महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या मातापित्यांप्रती जबाबदारी, उत्तरदायित्व तसेच देखभाल यासंदर्भातील मानकांबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ – श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

(२) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १० – महाराष्ट्र राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ – डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांचे

(३) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ११ – महाराष्ट्रातील भावी पिढीच्या शाश्वत भवितव्याची तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ – श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचे

(४) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १२ – महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी विधेयक, २०२५ – ॲड.अनिल परब, वि.प.स. यांचे

**(ख) अशासकीय ठराव :-**

**(शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले अशासकीय ठराव)** –

**(१) श्री.जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७७**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६०**

"शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान

भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४९**

"राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## "राष्ट्रगीत."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ जुलै, २०२५

**डॉ. विलास आठवले**
सचिव - ३,
महाराष्ट्र विधानपरिषद